# जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष

दूरध्वनी क्र.(0231) 2665813 ई-मेल-rdckop@gmail.com

क्र.कार्यासन12/नै.आपत्ती/आरआर/ /2020 दिनांक:- 13/03/2020

**वाचले:-**

1) दिनांक 12 मार्च, 2020 रोजीचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण बैठकीमध्ये घेणेत आलेल्या निर्णयाचे इतिवृत्तांत

---

**विषय :- कोरोना विषाणु प्रतिबंध उपाययोजना करण्यासाठी संपर्क अधिकारी नियुक्ती करण्याबाबत..**

**आदेश**

ज्याअर्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणू संसर्ग बाधित रुग्ण आढळून येत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन देशांतर्गत विमान प्रवासद्वारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत. त्यामुळे कोरोना विषाणूचे संशयित रुग्ण महाराष्ट्रात ही आढळून आल्याचे निदर्शनास आलेले आहेत. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसर्गात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. कोरोना आजारामुळे संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती कोल्हापूर जिल्हयात उदभवू नये यासाठी पुर्वतयारी व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अगत्याचे झाले आहे.

त्याअर्थी मी दौलत देसाई, अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, कोल्हापूर जिल्हयातील खालील तक्त्यामधील नमूद महसूल अधिकारी यांना त्यांचे नावासमोरील तालुकेकरीता संपर्क अधिकारी म्हणून घोषीत करीत आहे. त्याच प्रमाणे ज्या ठिकाणी उपविभागीय अधिकारी नसलेल्या संपर्क अधिकारी यांनी त्या त्या तालुक्याच्या उपविभागीय अधिकारी यांचेशी संपर्क साधून समन्वयाने काम करावे.तसेच संपर्क अधिकारी यांनी त्यांना नेमून दिलेल्या तालुक्यामध्ये कोरोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी सर्व यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात.

| अ.क्र. | संपर्क अधिकाऱ्योचे नाव | पदनाम | नेमून दिलेले तालुके |
|---|---|---|---|
| 1. | श्री.वैभव नावडकर | उपविभागीय अधिकारी,करवीर | करवीर व गगनबावडा |
| 2. | श्री. रामहरी भोसले | उपविभागीय अधिकारी,राधानगरी | कागल |
| 3. | श्री.विकास खरात | उपविभागीय अधिकारी,इचलकरंजी | हातकणंगले |
| 4. | श्री.संपत खिलारी | उपविभागीय अधिकारी,भुदरगड | आजरा,भुदरगड |
| 5. | श्री.अमित माळी | उपविभागीय अधिकारी,पन्हाळा | शाहुवाडी,पन्हाळा |
| 6. | श्रीमती विजया पांगारकर | उपविभागीय अधिकारी,गडहिंग्लज | गडहिंग्लज |
| 7. | श्री.दत्तात्रय कवितके | जिल्हा पुरवठा अधिकारी,कोल्हापूर | शिरोळ |
| 8. | श्री.सतीश धुमाळ | उपजिल्हा निवडणुक अधिकारी,कोल्हापूर | चंदगड |
| 9. | श्री.श्रावण क्षीरसागर | उपजिल्हाधिकारी, महसूल, कोल्हापूर | राधानगरी |

त्यात खालील उपाययोजनांचा प्रामुख्यांने समावेश आहे.

1) नमुद कार्यक्षेत्रासाठी कन्टेनमेंट आराखडा (Containment Plan) तयार करून त्याची अंमलबजावणी करावी.
2) सर्व महसूल, आरोग्य, ग्रामविकास व इतर अत्यावश्यक विभाग/ यंत्रणेमधील अधिकारी व कर्मचारी आपले मुख्यालयात राहतील याबाबत नियोजन करावे.
3) प्रत्येक गांव व नगरपालीका क्षेत्रात कोरोना विषाणू प्रसार रोखण्यासाठी प्रचार व प्रसार मोहिम हाती घ्यावी. त्यासाठी प्रत्येक गावातील ग्रामपंचायत प्रभाग व नगरपालिका क्षेत्रात प्रभागनिहाय शासनाकडून प्राप्त अधिकृत जाहिरात फलक लावणेत यावेत.

Scanned by CamScanner

4) प्रत्येक गावात व नगरपालिका क्षेत्रात दंवडी अथवा सार्वजनीक उद्घोषणा यंत्रणेव्दारे कोरोना विषाणू विषयक प्रतिबंधत्माक उपायोजनांच्या नियोजन करावे.

5) प्रत्येक गावांत मागील महिन्यापासुन परदेशगमन करून आलेल्या व्यक्तींचा शोध घ्यावा व अशा व्यक्तीची कोरोना विषयक तपासणी करण्यास बंधनकारक करावे.

6) नेमुन दिलेल्या तालुकेत कोणतेही गर्दीचे कार्यक्रम घेण्यात येणार नाहीत याबाबत कार्यवाही करावी.

7) कोरोना बाधीत संशयास्पद रूग्ण आढळल्यास, त्यांचे संपर्कात आलेल्या सर्व व्यक्ती व रूग्ण यांच्या तपासण्या आरोग्य विभागामार्फत कराव्यात.

8) अलगीकरण व विलगीकरण सुविधेसाठी नगरपालिका क्षेत्रात व मोठया गावातील खाजगी हॉस्पीटल व इतर इमारती मध्ये प्रत्येक तालुक्यात किमान 50 व्यक्तींची वैद्यकीय देखभाल व राहण्यासाठी सोय होईल अशी सर्व सोईनीयुक्त ठिकाणे निश्चीत करावीत.

9) तालुका स्तरावर तालुका नियंत्रण कक्षाची स्थापना करुन नियंत्रण कक्ष 24 तास कार्यन्वयीत राहील याची दक्षता घ्यावी व त्याचे संपर्क क्रमांकास व्यापक प्रसिध्दी देणेत यावी.

10) सार्वजनिक स्वच्छतागृहे, सार्वजनिक जागा, चित्रपट गृहे, मॉल्स, हॅाटेल्स, लॉज, ढाबे, नियमित हातळणेत येणारी टेबल, मेनू कार्ड, वॉश बेसीन व नळ, शौचालये, इमारतीमधील रिलींग व ज्या ठिकाणी हाताचा स्पर्श होऊन संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. अशा सर्व बाबी निर्जंतुकीकरण करण्याबाबत सुचित करावे व जन जागृती करावी.

11) कायदा व सुव्यवस्था यावर लक्ष ठेवण्यात यावे.

12) त्याचप्रमाणे दि. 15 फेब्रुवारी नंतर परदेशातून आलेल्या नागरीकांची विविध संस्था, संघटना वा व्यक्तीकंडून माहिती घ्यावी. तसेच भारतीय प्रवासी कोणत्या टूर ॲन्ड ट्रॅव्हल्सद्वारे किंवा ऐजंसी मार्फत किती प्रवासी परदेशात गेलेत व त्यांचा परतीचा प्रवास दिनांक सविस्तर माहिती जिल्हाधिकारी यांना कळविणेत यावी.

13) **नियंत्रण कक्ष क्रमांक**

1) राष्ट्रीय कॉल सेंटर क्रमांक ९१-११-२३९७८०४६
2) राज्यस्तरीय ०२०-२६१२७३९४
3) जिल्हास्तरावर
4) जिल्हा आपत्ती कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय- ०२३१-२६५९२३२ व टोल फ्री क्रमांक - १०७७
5) छत्रपती प्रमिलाराजे, हॉस्पीटल (CPR) ०२३१-२६४०३५५
6) जिल्हा परिषद आरोग्य विभाग ०२३१- २६६१६५३

वरील क्रमांकांची माहिती सर्व नागरीकापर्यंत जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर यांचेमार्फत प्रसिध्दी देणेत यावी.

14) तालुका स्तरावर तालुका नियंत्रण कक्षाची स्थापना करुन नियंत्रण कक्ष 24 तास कार्यन्वयीत राहील याची दक्षता घ्यावी व त्याचे संपर्क क्रमांकास व्यापक प्रसिध्दी देणेत यावी.

(दौलत देसाई)
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**

प्रति,
उपजिल्हाधिकारी, सर्व

प्रत:-
मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

Scanned by CamScanner